# जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,
# महिला कला महविद्यालय
# छत्रपती संभाजीनगर

## महिला अंर्तगत तक्रार निवारण समिती
## (विशाखा आदेश)
## वार्षिक अहवाल
## २०२३-२०२४

**अध्यक्ष् – प्राचार्य डॉ. रामकिशन दहिफळे**

**प्रमुख – डॉ. पल्लवी भावसार**

**सदस्य – डॉ. वनिता चव्हाण**

**सदस्य– सय्यदा सरवत फरहीन**

जे.एस.पी.एम संचलित महिला कलामहाविद्यालय, छ.संभाजीनगर येथीलशैक्षाणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्राचार्यच्या सुचनेवरुन महिला अंतर्गत तक्रार निवारण  समितीच्या प्रमुख म्हणून प्रा. डॉ. पल्ल्वी भावसार, यांना नियुक्त् केले होते. महिला  महाविद्यालयात ही सामिती अनेक वर्षापासून कार्यरत असून ह्या वर्षीही दरवषीप्रमाणे महाविद्यालयात काम करणारे प्राध्यापक पूरुष व महिला तसेच कार्यालयात काम करणारे सर्व सहकारी तसेच महाविद्यालयातील महिला विधार्थिनी यांच्या साठी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले होते. कामाच्या ठिकाणी होणारा जो अत्याचार आहे. तो रोखण्याच्या दृष्टीकोनातून काही मार्गदर्शनात्म्क कार्यक्रम ही समिती घेत असते.

तसेच ह्या समितीकडे महाविद्यालयात काम करणाऱ्या महिला कर्मचारी तसेच विद्यार्थीनी तक्रार करु शकतात. कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षितता मिळावी हा प्रमुख उद्देश डोळयासमोर ठेऊन ह्या समितीची स्थापना झालेली आहे.त्यासाठी महाविद्यालातर्फे वेगवेगळे कार्यक्रम घेतले जातात जेणे करून कामाच्या ठिकाणावरील महिला तसेच महाविद्यालयातील व शाळेतील विद्यार्थीयांना या समितीची माहिती व्हावी.व भविष्यात त्यांना स्वःताचे लैंगिक अत्याचारापासून रक्षण करण्यास हा कायदा उपयोगाचा ठरेल.

ह्या शैक्षणिक वर्षात पथनाट्य साजर करण्यात आले .यापथनाट्याद्वारे जाणीव जागृती करण्यात आली



,



पथनाट्य साजर करताना अंजली शेजूळ,धरती जाधव,अंजली साळवे,शीतल पाठक ,मुस्कान चौधरी ,वैशाली रगडे,खनसा शेख ,धनश्री शिदवाडकर,ऋतुजा मेहुणकर.




चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थीनींना स्व्रक्षणाची जाणीव व्हावी. तसेच महिला निवारण समिती म्हणजे काय, तिचा उद्देश काय आहे. व ती कधी स्थापन झाली याबाबतची विस्तृत माहिती विद्यार्थीनींना व्हावी त्यादृष्टीकोनातून महाविद्यालया मार्फत जिल्हा परिषद शाळेत मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित केला होता.जिल्हा परिषदच्या विद्यार्थीनीना तसेच महाविद्यालयाच्या विद्यार्थीनीना डॉ.पल्लवी भावसार व डॉ.वनिता साबळे मॅडमने विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

डॉ. वनिता साबळे मॅडमने मार्गदर्शनात पूढील मुद्यांवरती चर्चा केली.

1) महिला तक्रार निवारण समितीचा इतिहास.

2) महिला तक्रार निवारण समितीचा उद्देश.

3) कायद्यांविषयक विस्तृत माहिती.

4) विद्यार्थिनींनी स्वरक्षणा चे धडे ध्यावेत.

5) तक्रार नोंदवण्यासाठी काय करावे.

तसेच कायदे हे फक्त कागदावरच न राहता त्याचा प्रत्यक्ष उपयोग झाला पाहिजे अशी इच्छा मॅडमने व्यक्त केली.




समिती प्रमुख डॉ. पल्ल्वी भावसार यांनी वर्षेभरात केलेल्या समितीच कामाबधल सांगीतले व आपल्या महाविद्यालयातील परिसरात तसेच इतर ठिकाणच्या परिसरात काम करणाऱ्या महिलांवर अत्याचार होऊ नये यासाठी त्यांनी ह्या समितीची थोडी रचना स्पष्ट केली.त्यात त्यांनी महिलांनी अत्याचार सहन न करता त्यास विरोध करावा, आवाज उठवा असे सांगितले. त्यासाठी ही समिती नेहमीच कायद्याने तूमच्या पाठीशी आहे, असे सांगितले.




बी.ए.एस.वाय.ची विद्यार्थिनी शीतल पाठक ,हिने मनोगत व्यक्त केले . भविष्यासाठी आज मिळालेली माहिती आमच्या साठी खूप उपयुक्त ठरणार असे ती म्हणाली.